गांवकरी
www.gavakari.net
23 Dec 2025 - Page 3

# के. के. वाघ अभियांत्रिकीत प्रकल्प स्पर्धा उत्साहात

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्था संचालित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन महाविद्यालयाच्या वतीने नुकतेच प्रकल्प प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत दहा विभागांतील तीनशेहून अधिक प्रकल्प सादर करण्यात आले. यांत प्राथमिक स्तरावर ३२ प्रकल्पांची निवड करण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन व पारितोषिक वितरण सोहळा प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता डॉ. प्रीती भामरे, प्रा. नितीन शहाणे, परीक्षक प्रेमलता मिश्रा, अजित तांबे, देवेश सोनवणे, प्राध्यापकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. पहिले पारितोषिक सिव्हिल विभागातील अथर्व गव्हाणे, योगेंद्र राजपूत, सौम्य सोनवणे व वरुण कुलधर या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'साहित्य व्यवस्थापनात एआयचा प्रभावी वापर'ला मिळाले. विद्यार्थ्यांना प्रा. अनुप दुधेकर व प्रा. प्रिया रकिबे यांचे मार्गदर्शन मिळाले. दुसरे पारितोषिक आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागातील 'एआय पॉवरड डायग्नोसिस ऑफ न्युरो डेव्हलपमेंट डिसऑर्डर' या प्रकल्पाने पटकावले.